# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२५

## (सकाळी १०.१५ ते ११.४५ वाजता )

**(मंगळवार, दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक १ व २]**

(१) **श्रीमती उमा खापरे, सर्वश्री. प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"**राज्यात परिचर्या संचालनालय स्थापन करण्याबाबत**" या विषयावरील श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांचा दिनांक १० जुलै, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ४ मधील अतारांकित प्रश्न क्र. २३५८३ ला दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील."

(२) **सर्वश्री. सत्यजीत तांबे, विक्रम काळे, किशोर दराडे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"**सीबीएसई अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील इतिहासाचे लेखन अपुरे असल्याबाबत**" या विषयावरील श्री. सत्यजीत तांबे व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४४७४ ला दिनांक १८ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील."

**(बुधवार, दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ३ व ४]**

(३) **श्रीमती उमा खापरे, सर्वश्री. प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यातील दुर्गम भागातील मेळघाटात गेल्या पाच महिन्यांमध्ये शून्य ते सहा महिने वयोगटातील ६५ बालकांचा कुपोषणामुळे मृत्यू झाल्याची दखल मा. उच्च न्यायालयाने घेऊन शासनावर ताशेरे ओढले असणे, मेळघाट आणि अन्य आदिवासी भागातील मुलांचा कुपोषणामुळे मृत्यू ओढावत आहे तसेच येथील नागरिकांना इतरही समस्या भेडसावत असल्याने मा. उच्च न्यायालयात जनहित याचिकेच्या माध्यमातून सुनावणी घेण्यात आली असून सार्वजनिक आरोग्य, आदिवासी विकास, महिला आणि बालविकास व वित्त या चार विभागाच्या प्रधान सचिवांना उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आलेले असणे, त्यामुळे कुपोषणाने होत असलेले बालमृत्यू रोखण्याकरिता उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन यापुढे कुपोषणामुळे बालमृत्यू होणार नाहीत याची दखल

घेण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

(४) **सर्वश्री. शशिकांत शिंदे, एकनाथराव खडसे, अरुण लाड, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये दिनांक ५ जानेवारी, २०२४ पासून कार्यरत सुरक्षा रक्षकांना माहे जानेवारी, २०२४ ते मे, २०२४ पर्यंत शासन निर्णयानुसार वेतन प्राप्त होणे, परंतु, महानगरपालिका आयुक्त यांनी आस्थापना विभागास सुरक्षा रक्षकांना २८ हजार प्रमाणे वेतन देण्याचे आदेश दिल्यामुळे माहे जून, २०२४ पासून ते आजपर्यंत रुपये २८ हजार प्रमाणे वेतन अदा करण्यात येत असणे, महानगरपालिकेकडून शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे सुरक्षा रक्षक मंडळ, ठाणे विभाग यास वेतन अदा करण्यात येत नसल्यामुळे महानगरपालिकेकडून मंडळास अदा करण्यात येणाऱ्या वेतनात कपात होणे, सुरक्षा रक्षक मंडळाकडे कमी वेतन गेल्यामुळे सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षकांना प्रति महिना पूर्ण वेतन अदा न होणे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेंतर्गत कार्यरत सुरक्षा रक्षक यांना नियमित वेतन मिळत नसल्यामुळे मंडळाचे अध्यक्ष यांच्याकडे तक्रार केली असता अध्यक्षांनी मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त यांना शासन निर्णयाप्रमाणे वेतन काढण्यास वारंवार पत्रव्यवहार केला असणे, तरी देखील महानगरपालिका आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त यांनी शासन निर्णयाप्रमाणे वेतन न देणे, राज्यात अन्य महानगरपालिकेंतर्गतच्या आस्थापना विभागांमध्ये कार्यरत सुरक्षा रक्षक मंडळ यास शासनाने नियमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे वेतन अदा करण्यात येत असून, केवळ मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्येच कमी वेतन अदा करण्यात येत असणे, त्यामुळे सुरक्षा रक्षक मंडळाकडून मिळणारे फायदे सुरक्षा रक्षकांस मिळत नसणे, परिणामी प्रति महिना पूर्ण वेतन न मिळाल्याने सुरक्षा रक्षकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असून, मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील सुरक्षा रक्षकांना शासनाने नियमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे वेतन अदा करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही."

**(गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ५ व ६]**

(५) **सर्वश्री अमोल मिटकरी, विक्रम काळे, शिवाजीराव गर्जे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यातील खाद्य पदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी पुरेशी यंत्रणा अस्तित्वात नसल्याने मोठया प्रमाणात भेसळीचे प्रकार निदर्शनास येणे, दूध, दही, तूपासह बाटलीबंद पाणी, अंडी, पनीर, खवा याचबरोबर औषधे तसेच पिकांवर फवारणी केली जाणारी किटकनाशके यामध्ये मोठया प्रमाणात भेसळ होत असल्याची बाब निदर्शनास येणे, जनतेचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या या भेसळ करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता असणे, खाद्य पदार्थांतील भेसळीची तपासणी करण्याकरीता आवश्यक किट, पुरेशी अत्याधुनिक यंत्रसामुग्री, मनुष्यबळ, प्रयोगशाळा इत्यादी बाबींचा अभाव असणे, भेसळ करणारे हे त्यांचा नफा वाढविण्याच्या उद्देशाने भेसळ करीत असून त्याचा जनतेच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असणे, राज्यात भेसळ परिक्षणाच्या केवळ दोनच प्रयोगशाळा अस्तित्वात असल्याने भेसळयुक्त पदार्थांच्या चाचण्यांसाठी विलंब होत असणे, सदर अन्न पदार्थांतील भेसळीच्या माध्यमातून कोट्यवधी रकमेचा गैरव्यवहार होणे, अन्न पदार्थातील भेसळीचे तसेच बनावट औषध कंपन्यांचे रॅकेट रोखण्यासाठी अन्न सुरक्षा मानक कायदयाची कठोर अंमलबजावणी करुन व अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अधिकाधिक प्रयोगशाळा निर्माण करुन जनतेमध्ये जनजागृती करण्याकरिता उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

(६) **सर्वश्री सत्यजीत तांबे, किशोर दराडे, विक्रम काळे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"महाराष्ट्र राज्यात लाखो शिक्षक सेवक, विशेषतः खाजगी प्राथमिक शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांना शिक्षण हक्क कायद्याच्या (RTE) अंमलबजावणीच्या नावाखाली टीईटी (TET) परीक्षा उत्तीर्ण होण्याची सक्ती करण्यात आली असणे, नऊ वर्षांहून अधिक काळ प्रामाणिकपणे सेवा दिल्यानंतरही केवळ टीईटी परीक्षा उत्तीर्ण नसल्याच्या कारणास्तव नोकरी गमाविण्याची भीती निर्माण झाली असून त्यामुळे सदर शिक्षकांवर आणि त्यांच्या कुटुंबावर गंभीर मानसिक व आर्थिक संकट ओढवले असणे, केंद्र शासनाने सन २०१२ पूर्वी नियुक्त केलेल्या शिक्षकांना टीईटी परिक्षेतून सूट दिलेली असताना, राज्य शासनानेही त्याच धर्तीवर सेवाज्येष्ठता विचारात घेऊन लाखो शिक्षकांना दिलासा देण्याची आवश्यकता असणे, वारंवार मुदतवाढ देऊनही अनेक शिक्षक टीईटी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकले नाहीत, कारण टीईटी परीक्षेचे स्वरूप व अभ्यासक्रम अत्यंत क्लिष्ट असणे, हा प्रश्न केवळ टीईटी परिक्षेपुरता मर्यादित नसून राज्यातील हजारो शिक्षकांच्या रोजगाराशी निगडित असणे, तरीही या गंभीर प्रश्नाकडे शासकीय यंत्रणेने दुर्लक्ष केलेले असणे, तसेच जुन्या पेन्शन योजनेचा लाभ नाकारल्यामुळे शिक्षकांमध्ये असंतोष वाढलेला असणे, या सर्व

पार्श्वभूमीवर शासनाने मानवतेच्या दृष्टीकोनातून संबंधित शिक्षकांना सेवा संरक्षण प्रदान करणे अत्यंत आवश्यक असणे, त्यांची सेवाज्येष्ठता व अनुभव विचारात घेऊन टीईटी परिक्षेतून सूट देण्याबाबत सकारात्मक व आवश्यक निर्णय शासनाने तातडीने घ्यावा, अशी मागणी करण्यात येत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : (क) प्रश्नोत्तरे**

**(ख) तारांकित प्रश्नांची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

(१) "अकोला शहरातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत" या विषयावरील श्री.अमोल मिटकरी व इतर वि.प.स यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक २१९३४ ला दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) "नागपूर महानगरपालिकेंतर्गत भांडेवाडी येथील कामातील टेंडर प्रक्रियेमध्ये होणाऱ्या गैरव्यवहाराबाबत" या विषयावरील दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी श्री.प्रविण दटके व इतर वि.प.स यांची सर्वसाधारण अर्धा तास चर्चेची सूचना क्र. २१७१ वरील चर्चेदरम्यान अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **मुख्यमंत्री** : (क) "महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ख) "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री** : (क) "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ख) "मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली, ता.पनवेल यांचे सन २०१९-२०२०, सन २०२०-२०२१ व २०२१-२०२२ या

वर्षांचे अनुक्रमे तेहतीसावा, चौतीसावा व पस्तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ग) "शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(घ) "मुंबई रेलवे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ङ) महाराष्ट्र मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(च) "मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०२२-२०२३ व सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३) पशुसंवर्धन मंत्री** : "पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(४) आदिवासी विकास मंत्री** : "शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा पंचवीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(५) कृषी मंत्री** : (क) "डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(ख) "महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा छप्पन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(६) **परिवहन मंत्री** : "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या वर्षांचा वार्षिक प्रशासन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

(१) **ॲड.अनिल परब, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्री महोदयांनी आयआयटी बॉम्बेच्या नावाबाबत केलेल्या वादग्रस्त विधानाबाबत.

(२) **श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३ वर उप मुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री निवेदन करतील :-**

वरळी, मुंबई येथील बीडीडी चाळ नं. ५, गणपत जाधव मार्ग, मुंबई या चाळीची पुनर्विकास योजनेअंतर्गत म्हाडाने प्रसिध्द केलेली सोडत रद्द केल्याबाबत.

(३) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

राज्यात तब्बल १५ हजार ३५७ किशोरवयीन मुली शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर राहिल्याबाबत.

(४) **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४ वर कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील पदवीधर बेरोजगार युवकांना निर्वाह भत्ता लागू करुन रोजगार प्राप्तीसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याबाबत.

(५) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५ वर परिवहन मंत्री निवेदन करतील :-**

नाशिक - पुणे दोन प्रमुख शहरांना जोडणारा सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प उभारण्याबाबत.

**चार : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

(१) **श्री.विक्रांत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पनवेल-नवी-मुंबईचे क्षेत्र ३४४ चौ. कि.मी. असणे, परंतु नैना व तिसरी मुंबई प्रकल्पामुळे ते कित्येकपटीने वाढणे, पनवेल-आंतरराष्ट्रीय विमानतळ या महत्त्वाच्या प्रकल्पामुळे या परिसरातील लोकसंख्येतील झालेली प्रचंड वाढ, पी.एम.सी. हद्दीतील तळोजा-पनवेल क्षेत्रावर प्रचंड लोकसंख्येचा येत असलेला ताण कमी करण्याकरीता सोयीसुविधा वाढविण्याकरीता शासनाने सिडको व पी.एम.सी. हद्दीतील नियोजन व प्रगती पदावर असलेली सर्व विकासकामे यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी महानगरपालिका प्रतिनिधी, सिडको-प्रतिनिधी व लोकप्रतिनिधी यांची समन्वय-समिती नेमणे, सायन-पनवेल महामार्गाला पर्याय म्हणून खारघर कोस्टल-रोडचा नवीन-पनवेल पर्यंत विस्तार करणे, तळोजा-प्रादेशिक-उद्यान क्षेत्रात मनोरंजन व विरंगुळा केंद्र बनविणे व खारघर शहरातील सेंट्रल पार्कचे शिल्लक २/३ काम पूर्णत्वास नेऊन जागतिक दर्जाचे अम्युझमेंट पार्क बनविणे, तळोजा परिसरातील एम.आय.डी.सी. मार्फत विकसित जागेत माहीम खारफुटी उद्यानाच्या धर्तीवर मोठे खारफुटी उद्यान बनविणे, पनवेल मधील सर्व नद्यांचे पुनर्जीवन तसेच एकात्मिक नदीकाठ विकास प्रकल्पाची अंमलबजावणी करणे, तळोजा मेट्रोचा विमानतळपर्यंतचा विस्तार करून विमानतळ मेट्रो कॉरिडॉर पुष्पकनगर मार्गे गोल्डन-लाईनशी जोडून तळघरला जोडण्याबाबत निर्णय घेणे, या मागण्या पनवेल-नवी मुंबईतील लाखो जनतेने राज्य-शासनाकडून वारंवार करणे, या मागणीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, या मागण्यांची पूर्तता होत नसल्याने जनतेमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, सदाशिव खोत, अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे शहरातील हडपसर येथील स्वागत हॉटेल जवळील नागरिकांना रस्ता, पाणी व अन्य नागरी समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, मौजे साडेसतरा नळी गावाजवळील यश हॉस्पिटल ते पाईपलाईन येथे १८ मी. आर. पी. रस्ता करण्यासाठी निविदा काढूनही अद्याप रस्ता न करणे, मॉल, वृंदावन हाइट्स, आर. पी. रस्त्यामधील झाडे व एचडी फीडर, पिलर ड्रेनेज लाईन, रस्ता लेबर शेड मजूर वस्ती ही रस्त्यामध्ये असून या तसेच अन्य समस्यांमुळे संपूर्ण परिसरातील रस्ता, पाणी आणि अन्य सुविधाही रखडलेल्या असणे, त्यामुळे येथील नागरिकांना रस्ता, पाणी आणि अन्य समस्यांचा सतत सामना करत जीवन जगावे लागत असणे, त्यासाठी त्यांनी मनपा आयुक्त, मुख्य अभियंता पाणीपुरवठा, मुख्य अभियंता पत विभाग पुणे यांना वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही प्रशासन कोणतीच कारवाई

करत नसल्याने येथील रहिवासी नाराजी व्यक्त करीत असून त्यांनी आंदोलनाचा इशारा दिलेला असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.मिलिंद नार्वेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"देशातील सर्वांत आधुनिक महामार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर अपघातांची संख्या आणि मृत्यू यांमध्ये २६ टक्के वाढ झाल्याची धक्कादायक बाब दि. २५ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली असणे, समृद्धी महामार्गावर जीवघेण्या अपघातांची संख्या सन २०२४ मधील ६८ वरून सन २०२५ मध्ये ९४ वर गेली असणे, तर अपघाती मृत्यूंच्या संख्येत १६ टक्के वाढ नोंदवण्यात येणे, रस्तेप्रवास वेगवान होण्यासाठी बांधलेला हा महामार्ग वाहनचालकांच्या चुकीमुळे मृत्यूचा मार्ग ठरला असणे, यावर्षी आजमितीपर्यंत 'समृद्धी' महामार्गावर १०७ प्रवाशांनी जीव गमावलेला असणे, यंदाच्या वर्षी नऊ महिन्यांत जीवघेण्या अपघातांसह ज्यामध्ये प्रवासी गंभीर आणि किरकोळ जखमी झाले आहेत अशा एकूण अपघातांची संख्या १३१ वर पोहोचलेली असणे, यामुळे 'समृद्धी'वर राबवण्यात येणाऱ्या उपाययोजनांवर उपस्थित झालेले प्रश्नचिन्ह , सन २०२५ च्या डिसेंबर महिन्यात पर्यटनासाठी मोठ्या संख्येने प्रवासी या महामार्गावरून प्रवास करणार असून या महामार्गावर बेदरकार आणि भरधाव वाहन चालवल्याने रस्ते अपघातांचे व मृत्यूचे प्रमाण वाढण्याची निर्माण झालेली भीती, तसेच या महामार्गावर मूलभूत सुविधांची असलेली वानवा, त्यामुळे प्रवाशांची होत असलेली गैरसोय, यास्तव वाहतूक सुरक्षेसाठी समृद्धी महामार्गावर अपघातप्रवण क्षेत्रात प्रयोगात्मक उपाय राबविण्याबाबत, तसेच प्रवाशांसाठी मूलभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री.कृपाल तुमाने, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील aided शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये ट्युशन क्लासेससोबत बेकायदेशीर स्वरूपाचे टाय-अप्स झाल्याची गंभीर माहिती उघडकीस येणे, या टाय-अप्समुळे विद्यार्थी शाळेत दाखल झाल्यानंतर शाळेची नियमित उपस्थिती न लावता दिवसभर क्लासेसमध्येच शिकवले जात असणे, शाळा केवळ नावापुरती उपस्थिती दाखवून विद्यार्थ्यांचे निकाल लावत असणे, यामुळे शासकीय अनुदानाचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर, शिक्षण व्यवस्थेची फसवणूक, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला अडथळा, तसेच मानक शिक्षणाची पातळी घसरत असणे, अनुदानित शाळांना Grant-in-Aid देण्यामागील मूलभूत उद्देश विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे, नियमित उपस्थिती

राखणे आणि शाळेतील सुविधांचा व शिक्षकांचा प्रत्यक्ष उपयोग करणे, असे असतानाही विद्यार्थी प्रत्यक्ष शाळेत न जाता दिवसभर क्लासेसमध्ये जात असल्याने शासनाचा निधी विनाकारण खर्च होत असणे, तसेच शाळेतील सामाजिक-सांस्कृतिक उपक्रम, प्रयोगशाळा, क्रीडा क्रिया, नैतिक मूल्य शिक्षण हे सर्व घटक अनुपस्थित राहणे, परीक्षाभिमुख पद्धतीमुळे विद्यार्थ्यांचे संकल्पनात्मक ज्ञान कमकुवत होणे, शाळा व क्लासेसचे दुहेरी भार विद्यार्थ्यांवर अनावश्यक ताण निर्माण करीत असणे, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून ज्या aided शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती ५०% पेक्षा कमी आढळते आणि क्लासेससोबत टाय-अपचा पुरावा सापडतो त्यांचे अनुदान तातडीने स्थगित करण्यात करण्याची तसेच दोषी संस्थांवर आर्थिक दंड वा मान्यता रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **सर्वश्री सतिश चव्हाण, विक्रम काळे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात ४ कृषी विद्यापीठे कार्यरत असून सुधारित ११४०० पदांचा सुधारित आकृतीबंध मान्यतेसाठी प्रलंबित असणे, आकृतीबंध मंजूर होत नसल्याने तांत्रिक अतांत्रिक पदांची भरती प्रक्रिया रखडली असणे, राज्यातील सर्व कृषी विद्यापीठे मिळून सरासरी ६५ टक्के पदे रिक्त असणे, त्यात परभणी ६६ टक्के, अकोला ६३ टक्के, राहुरी ५५ टक्के, तर दापोली ४१ टक्के एवढी मोठया प्रमाणावर पदे रिक्त असल्याने राज्याच्या कृषी क्षेत्राला दिशा देणाऱ्या आणि हजारो विदयार्थ्यांचे भविष्य घडवणाऱ्या विद्यापीठात रिक्त पदांचे ग्रहण लागले असणे, रिक्त पदांमुळे शिक्षण आणि संशोधनाचा गाडा अक्षरश: खिळखिळा झालेला असणे, नोकर भरती आणि प्रशासकीय अनास्थेमुळे कृषी शिक्षणाचा दर्जा खालावला जात असणे, सेवा प्रवेश मंडळाचे पद बऱ्याच दिवसापासून रिक्त असल्याने अधिष्ठाता, संचालक, विभाग प्रमुख आणि प्राध्यापक अशा महत्वाच्या नियुक्त्या रखडल्या असणे, अर्थसंकल्पीय अधिवेशन सन २०२५ मध्ये या प्रकरणी आश्वासीत केले असणे, तरीही याबाबतीत काहीही कार्यवाही होत नसणे, सुधारित ११४०० पदाचा आकृतीबंध तात्काळ मंजूर करुन पदभरतीसाठी तात्काळ कार्यवाही करण्याकरीता होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **सर्वश्री राजेश राठोड, अभिजित वंजारी, सतेज उर्फ बंटी पाटील, अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, जयंत आसगावकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात बंजारा समाजाचा समावेश विमुक्त जातीमध्ये असून तेलंगणा, आंध्र प्रदेश व अनेक राज्यामध्ये बंजारा समाज हा आदिवासीमध्ये समाविष्ट असल्याने राज्यात सुध्दा बंजारा समाजाचा समावेश अनुसूचित जमाती (ब) मध्ये करण्याची मागणी अनेकवेळा राज्य शासनाकडे करण्यात आली असणे, याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यामुळे राज्यातील बंजारा समाजात तीव्र असंतोष पसरल्यामुळे त्यांच्याकडून अनेकवेळा आंदोलने करण्यात आली असणे, याबाबत राज्य शासनाने त्वरीत निर्णय घेऊन शासनाने विमुक्त जाती (अ) मधून अनुसूचित जमाती (ब) मध्ये समावेश करुन देण्याची होत असलेली मागणी विचारात घेता कोणत्याही मूळ आरक्षणाला धक्का न लागता बंजारा समाजाला न्याय देण्यासाठी राज्य शासनाने तातडीने निर्णय घेऊन बंजारा समाजाचा समावेश अनुसूचित जमाती (ब) मध्ये करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री.एकनाथराव खडसे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कोरोना काळात राज्यभरात ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, सिव्हील हॉस्पिटल आणि जिल्हा रुग्णालये येथे तातडीने आणि मोठ्या प्रमाणात उभारण्यात आलेले ऑक्सिजन प्लांट आज सध्या निष्क्रिय अवस्थेत पडलेले दिसणे, त्या काळात प्राणवायूच्या अत्यंत तीव्र टंचाईमुळे जीव वाचवण्यासाठी समाजसेवी शासन, संस्था यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून ही यंत्रणा उभारली असणे, मात्र आज महामारी ओसरल्यानंतर राज्यात कुठेही या प्लांटचा प्रत्यक्ष वापर होत नसणे, अनेक ठिकाणी ती बंद पडून गंजेपर्यंत धूळ खात असणे, या निष्क्रिय ऑक्सिजन प्लांटचा वापर औद्योगिक क्षेत्रात त्वरित होणे गरजेचे असणे, उद्योग क्षेत्रात उत्पादन प्रक्रियेसाठी ऑक्सिजनची सतत आवश्यकता असणे, हे प्लांट उद्योग क्षेत्राशी जोडून रोजगारनिर्मिती करण्याची आवश्यकता असणे आणि शासनाचा खर्चही उपयोगात येणे, सदर ऑक्सिजन प्लांट भाडेतत्त्वावर देवून तात्काळ कार्यान्वित करण्याची आवश्यकता असणे, शासनाला भाडे मिळून प्लांटची मशिनरी सुद्धा सुस्थितीत राहणे, शासनाने तातडीने या प्लांटचे सर्वेक्षण करून औद्योगिक वापरासाठी हस्तांतरण करण्याचा निर्णय घेणे आवश्यक असणे, अन्यथा कोट्यवधी रुपयांचा निधी वाया जाण्याची शक्यता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**सहा म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**(१) श्री. विक्रांत पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

" राज्यातील पनवेल व नवी मुंबई या शहरांची उभारणी करून मुंबईकडे येणारा जनप्रवाह नवी मुंबई व पनवेलच्या दिशेने वळविणे तसेच रोजगाराकरिता स्थलांतर करणाऱ्या लोकांना त्या शहरात, पर्यायी नागरी व्यवस्थेबरोबरच, सौख्यपूर्ण जीवनासाठी आवश्यक असणा-या सर्व सुविधा आणि स्थैर्य देण्यासाठी "महाराष्ट्र शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ" या स्थापना करण्यात आलेल्या प्राधिकरणाकडून अनेक चुकीचे प्रकार घडत असल्याची बाब उघडकीस येणे, सर्वसामान्यांना परवडतील अशा उत्तम गुणवत्ता असलेल्या घरांची बांधणी करून ती लॉटरीद्वारे विक्री करणाऱ्या सिकडोकडून देण्यात आलेली घरे ही निष्कृष्ट दर्जाची असणे, चुकीच्या पद्धतीने आकारले जाणारे मेंटनन्स चार्जेस व पाणी पट्टी कर, घरांचा ताबा देत असताना ग्राहकांना कबूल केलेल्या अटी व शर्ती यांचे पालन करताना सिडकोकडून होत असलेली टाळाटाळ, सिडकोच्या घरांच्या किंमती या खाजगी विकासकांपेक्षा वाढीव असणे, E.W.S. अंतर्गत प्रकल्प बांधकाम करून त्या घरांची L.I.G. अंतर्गत करण्यात आलेली विक्री, प्रधान मंत्री आवास योजनेच्या लाभापासून ग्राहकांना वंचित ठेवण्याचा सिडकोकडून सातत्याने होत असलेला प्रयत्न, सिडकोने विकसित केलेल्या वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेली गैरसोय व पायाभूत सोयीसुविधांचा अभाव, त्यातच आंतरराष्ट्रीय पनवेल-नवी मुंबई विमानतळाच्या २० कि.मी. त्रिज्येतील परीक्षेत्राचा सुनियोजित ध्येय ठेवून "नैना सिकडो- विशेष नियोजित प्राधिकरणाची सन २०१३ मध्ये करण्यात आलेली स्थापना, या नियोजनामध्ये मोठ्या प्रमाणात असलेल्या त्रुटी तसेच ड्रोन सर्व्हे ऐवजी जागेवर प्रत्यक्ष सर्व्हे करण्यात सिडकोच्या कामात कमी असलेली गती, शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन कार्यवाही करण्याची नितांत गरज असताना त्याकडे जाणुन-बुजून करण्यात येत असलेले दुर्लक्ष, रस्त्यामध्ये बाधित होणाऱ्या घरांचे पुनवर्सन कसे होणार हे अस्पष्ट असून जागेसंदर्भात शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे कागदपत्र देण्यात न आल्याने तसेच नैना क्षेत्रातील घरांचे बंद असलेले रजिस्ट्रेशन तात्काळ सुरू करण्याच्या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने लाखो शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झालेली तीव्र चीड, लोकप्रतिनिधी, सर्वसामान्य नागरिक, शेतकरी यांच्याकडून वेळोवेळी करण्यात येत असलेल्या विविध तक्रारींचे निराकरण होत नसल्याने सिडकोच्या कार्यपद्धतीवरील उडत चाललेला जनतेचा विश्वास, सिडकोचा कारभार योग्य व सुनियोजित तसेच सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून चालावा याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(२) सर्वश्री इद्रिस नायकवडी, विक्रम काळे, शिवाजीराव गर्जे, वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"महाराष्ट्र शासनाने संपूर्ण लिंगायत समाजासाठी महात्मा ज्योती बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केलेली असणे, तथापि लाभ देतांना इतर मागासवर्गात असण्याची अट लादण्यात आलेली असणे, लिंगायत समाजातील सर्वच घटक, इतर मागास संवर्गात येत नाही, केवळ २ ते ३% लोक या संवर्गात मोडत असणे, त्यामुळे संपूर्ण लिंगायत समाजास याचा लाभ मिळत नसणे. महामंडळाच्या स्थापनेचा उद्देश त्यामुळे साध्य होत नसणे, संपूर्ण लिंगायत समाजास याचा लाभ मिळणेसाठी इतर मागास संवर्गाचा असलेला उद्देश वगळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भुमिका."

**सात : शासकीय विधेयके –**

**(क) विचार, खंडशः विचार व संमत करणे:-**

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १६ – महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, राजेश राठोड, अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १६ – महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे:-**

(१) "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९२ – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री एकनाथराव खडसे, सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९२ – महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(२) "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९६ - महाराष्ट्र जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री एकनाथराव खडसे, सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९६ - महाराष्ट्र जन विश्वास (तरतुदींची सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(३) "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०० - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०० - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधानसभेने सुधारणेसह संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे:-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०१ - हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०१ - हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

(१) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०३ - महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

(२) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९३ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५.

(३) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०५ — मामलतदार न्यायालय (सुधारणा) विधेयक, २०२५.

**(च) विधानसभेने संमत केल्यास — विधेयक विचारात घेणे :-**

सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०२ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५

**आठ :** **(गुरूवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**श्री.सतेज उर्फ बंटी पाटील,** ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, वि.प.स. यांचा **म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात माहे जून ते सप्टेंबर या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी-ओला दुष्काळ यामुळे राज्यातील शेतकरी हवालदिल झालेला असणे, शेतकऱ्यांना देण्यात आलेले मदतीसाठीचे पॅकेज "फसवे" असणे, बहुतेक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष तुटपुंजी मदत मिळणे, शेतीचे पंचनामे करण्यास प्रशासनाकडून विलंब होत असल्याने निधी वितरणात गोंधळ उडालेला असणे, अब्जावधींचे पीक कर्ज थकित असताना शेतकऱ्यांना कर्जमाफी न देता व्याजाचा अधिक बोजा लादणे हा निर्णय शेतकऱ्यांना अधिक खोल कर्जामध्ये ढकलणारा असणे, मा.मुख्यमंत्री यांनी कर्जवसुली स्थगितीची घोषणा करणे, परंतु प्रत्यक्ष आदेश न

देता बँका शेतकऱ्यांच्या घरांवर धाड मारत असणे, राज्य व केंद्र शासनातील मतभेदांमुळे प्रस्ताव सादरीकरणात झालेल्या विलंबाचा थेट परिणाम म्हणून शेतकरी आत्महत्यांच्या प्रकरणात झालेली वाढ, कापूस-सोयाबीन-धान-ऊस बाजारभाव, खरेदी प्रक्रिया, आयात धोरणे आणि हवामानामुळे निर्माण झालेल्या संकटांवर शासनाचे सततचे मौन व निष्क्रियता ही शेतकऱ्यांविषयीची गंभीर उदासीनता आणि प्रशासकीय अपयश स्पष्टपणे अधोरेखित करणे, राज्यातील अनेक महत्वाच्या महानगरपालिका, नगरपरिषद व विकास प्रकल्पांमध्ये भ्रष्टाचार, अनियमितता आणि निकृष्ट दर्जा सतत निदर्शनास येवूनही जबाबदार अधिकारी, कर्मचारी व ठेकेदार यांचेवर कारवाई करण्यास होत असलेले दुर्लक्ष, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांची जुनी पेंशन, नियमित वेतन, वेतनेत्तर इतर भत्ते, पदभरती, शिक्षक भरती, संच मान्यतेचे निकष बदलविणे, समायोजन समग्र शिक्षा अभियानंतर्गत २५०० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत समावून घेणे इत्यादी प्रश्न निकाली न निघणे, उच्च शिक्षण विभागांतर्गत प्राध्यापक भरती न होणे, शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेतन लागू न झाल्यामुळे त्यांच्या मध्ये असंतोष पसरणे, कामगार विभागातील गृह उपयोगी व सेफ्टी किट निविदेतील गैरव्यवहार, निकृष्ट दर्जाच्या वस्तूंची खरेदी, निविदा प्रक्रियेत पारदर्शकता नसणे, बंजारा समाजाचा अन्य राज्याप्रमाणे आदिवासी संवर्गात समावेश करणे, मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या इमारतीचा प्रश्न, ७९ बी कायदयामुळे इमारती पुनर्वसनाचे प्रकल्प रखडणे, केंद्र शासनाच्या अंतर्गत जमीन विकास न होणे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जल जीवन मिशन योजनेअंतर्गत अनेक कामे अपुर्णावस्थेत असूनही ठेकेदारांना देयके वितरीत करुन करण्यात आलेला गैरव्यवहार, राज्यातील परिवहन खात्यात मोठया प्रमाणात होत असलेला गैरव्यवहार, उक्त प्रकरणी तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**नऊ अशासकीय ठराव :-**

**(मंगळवार, दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत) —**

**(१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ४६**

"मुंबई व उपनगरातील खाजगी विकासकांनी बांधलेल्या सदनिकांच्या किंमती सर्वसामान्याच्या आवाक्याबाहेर असल्याने म्हाडाने मुंबई व

उपनगरातील नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य ग्राहकांना परवडतील अशा सदनिका बांधण्याचा कालबध्द कार्यक्रम शासनाने तातडीने हाती घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे".

**(२) श्री.जयंत आसगावकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ३२**

"राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे".

**(३) श्री. वसंत खंडेलवाल, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ५७**

"राज्यात तालुका स्तरावरील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत जेणेकरून तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही व आर्थिक भुर्दंड ही सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबद्ध कार्यक्रमातून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ११ डिसेंबर, २०२५

**डॉ.विलास आठवले**
सचिव - ३ ,
महाराष्ट्र विधानपरिषद